**२) फौजदारी प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४ नुसार संवेदनशिल व महत्वाच्या ठिकाणी,आजूबाजूच्या परिसरात तसेच संपूर्ण पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात ड्रोन व ड्रोन सदृश्य कॅमे-याने छायाचित्रण (शुटींग) करण्यास प्रतिबंधात्मक आदेश.**

**संदर्भ :-** आळंदी पोलीस स्टेशन जाक्र/२७७६/२०२३ दिनांक ०६/०५/२०२३ अन्वये.

ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील आळंदी पोलीस स्टेशन हद्दीतील संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज व देहुरोड पोलीस स्टेशन हद्दीतील जगदगुरु संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांचे पादुका पालखी प्रस्थान सोहळा व आषाढी वारी सालाबाद प्रमाणे दिनांक ०७/०६/२०२३ ते दिनांक १२/०६/२०२३ रोजी दरम्यान संपन्न होणार आहे.

यात्रा उत्सव काळात संपुर्ण महाराष्ट्र व परराज्यातुन सुमारे ७ ते ८ लाख भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. श्री. ज्ञानेश्वर महाराज व जगदगुरु संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळ्याचे कालावधीत आळंदी शहरात व देहुगाव येथे लाखो भाविक मंदिर तसेच मंदिर परिसरात एकाच ठिकाणी एकवटलेले असतात. त्यामुळे संपुर्ण आळंदी शहर व देहुगाव हे भाविकांनी गजबजलेले असते. अलीकडच्या काळातील वाढते दहशतवादी हल्ल्याचा व घातपात कारवायांचा विचार करता ड्रोन सारखे इलेक्ट्रिक साधनांचा वापर करुन घातपात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच जम्मू मध्ये स्फोटके भरलेले दोन ड्रोन जम्मू विमानतळावरील भारतीय विमान स्टेशनवर आदळली, ज्यामुळे इमारतीच्या छताला छोटया प्रमाणात क्षती पोहोचली, दुसरे ड्रोन मोकळया जागी आदळले. अशा प्रकारे काश्मीर मध्ये ड्रोन वापरुन बॉम्ब हल्ला करण्यात आलेला आहे. या पाश्वभुमीवर घातपात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच आषाढी वारी करीता येणारे भाविक हे ग्रामीण भागातील असुन त्यांना ड्रोन कॅमेरा ज्ञात नाही. त्यामुळे अचानक ड्रोनद्वारे चित्रीकरण करण्यात आले तर भाविकांमध्ये अफवा पसरुन गडबड गोंधळ उडुन चेंगराचेंगरी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मी विनय कुमार चौबे पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४(१) (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार जारी केलेले प्रतिबंधात्मक आदेश कायम ठेवुन. पुणे जिल्ह्यातील आळंदी शहर येथील श्री. संत ज्ञानेश्वर मंदिर व परिसर तसेच देहुगाव येथील जगदगुरु संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज मंदिर तसेच श्री.विठ्ठल मंदिर देहूगाव, परिसर व संपुर्ण पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये दि.०७/०६/२०२३ रोजीचे ००/०० ते दि. १२/०६/२०२३ रोजीचे मध्यरात्री २४/०० वा. पर्यंत ड्रोनव्दारे किंवा ड्रोन सदृश्य कॅमेराव्दारे पुर्व परवानगी शिवाय छायाचित्रण (शुटींग) करण्यास व **कोणत्याही प्रकारचे ड्रोन उडविण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.**

उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहीती प्रसारमाध्यमे, सर्व पोलीस स्टेशन, परिमंडळीय पोलीस उपायुक्त कार्यालय, सहा.पोलीस आयुक्त,कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरीकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदर मनाई आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**सदरचा आदेश दि -०६/०६/२०२३ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला आहे.**